**वसंतराव नाईक तांडा/वस्ती सुधार योजनेमध्ये**
**दलित वस्ती सुधारणा योजनेच्या धर्तीवर तांडा/वस्ती**
**सुधार योजना सुधारित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग**
**शासन निर्णय क्र. तांसुयो २०१७/प्रक्र-८४/विजाभज-१,**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक- ३० जानेवारी, २०१८

वाचावे:-१) शासन निर्णय, सामाजिक न्याय सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्र. इमाव २००३/प्रक्र २०५/मावक-३, दि. ७ जून २००३.
२) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. इमाव २००३/प्रक्र २०५/विजाभज -१, दि. २८ ऑगस्ट २०१३
३) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. तांसुयो २०१४/प्रक्र १६८/विजाभज-१, दि. २१ फेब्रुवारी २०१५
४) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. इमाव २००८/प्रक्र १८०/मावक-३, दि. १९ डिसेंबर २००८

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्यात भटक्या जमातीच्या अनेक जाती जमाती अजूनही भटकंती करुन स्थलांतरित स्वरुपाचे जीवन जगतात. लमाण, बंजारा, वंजारी, धनगर, पारधी अशा अनेक समूहांचे तांडे/वस्त्या असून अशा तांडयांमध्ये या जमाती अनेक वर्षांपासून रहात असल्या तरी अशा तांडे किंवा वस्त्यांना प्राथमिक सुविधा उपलब्ध होत नाहीत व त्यामध्ये आधुनिकतेकडे कल असला तरी बहुसंख्य समाज गरीबीचे जीवन जगत आहे. त्यासाठी तांडे, वाडी किंवा वस्त्या यामध्ये या समाजास स्थिर जीवन जगता यावे याकरिता सुधारणा होणे आवश्यक आहे. अनुसूचित जातीच्या वसाहतीत "दलित वस्ती सुधारणा योजना" सन १९७२ पासून राबविण्यात येत आहे व या योजनेची फलश्रुती चांगली असल्याचे मूल्यमापनात आढळून आले आहे. ही बाब विचारात घेऊन दलित वस्ती सुधार योजनेच्या धती्रवर राज्यातील भटक्या समाजाच्या सुधारणेसाठी तांडा/वस्ती सुधार योजना उपरोक्त वाचा येथील क्रमांक १ च्या शासन निर्णयाद्वारे सुरु करण्यात आली आहे. सदर योजनेमध्ये काही सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यात अनुसूचित जातीसाठी राबविण्यात येणाऱ्या "दलित वस्ती सुधारणा योजना" या योजनेच्या धर्तीवर राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग याकरिता सोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये नमूद केलेलया अटी व शर्तीच्या अधीन राहून उपरोक्त वाचा येथील क्रमांक ३ येथील शासन निर्णयाद्वारे सर्व जिल्हयांच्या सहायक आयुक्त, समाज कल्याण यांनी या

योजनेच्या प्रस्तावास मान्यता देण्याकरिता जिल्हास्तरीय समितीवर नवीन अशासकीय अध्यक्ष व सदस्य यांच्या नियुक्त्यांचे एकत्रित प्रस्ताव संचालक, विमुक्त जाती,भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण संचालनालय, पुणे मार्फत शासनास सादर करण्याबाबत दिलेले आदेश रद्द करुन या योजनेमध्ये परिशिष्ट अ प्रमाणे सुधारणा करण्यास या शासन निर्णयाद्वारे मंजूरी देण्यात येत आहे :-

| अक्र | लोकसंख्या | अनुदान रक्कम (रु.लक्ष) |
|---|---|---|
| १ | ५० ते १०० लोकसंख्या असलेले तांडे/वस्त्या | ४.०० |
| २ | १०१ ते १५० लोकसंख्या असलेले तांडे/वस्त्या | ६.०० |
| ३ | १५१ पेक्षा अधिक लोकसंख्या असलेले तांडे/वस्त्या | १०.०० |

२. तांडा/वस्ती सुधार योजने अंतर्गत करण्यात येणारे पायाभूत सुविधांबाबतचे काम ग्रामपंचायत व पंचायत समितीच्या मदतीने करण्यात यावे. संचालक, विमुक्त जाती,भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण संचालनालय, पुणे यांना कामाकरिता आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. तांडा/वस्ती सुधार योजनेसाठी होणारा खर्च पुढील लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व हा खर्च प्रतिवर्षी करण्यात येणाऱ्या तरतुदीमधून भागविण्यात यावा.

मागणी क्रमांक एन-३,
२२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण
८०-सर्वसाधारण
८००- इतर खर्च
(०१) मागासवर्गीयांना अनुदान
(०१)(०५) विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग यांच्याकरिता तांडावस्ती सुधार योजना (२२२५ ३३२२)
३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)

४. या योजनेअंतर्गत निधी वितरणाबाबतची कार्यवाही दि.३१.३.२०१८ पर्यंत संदर्भ क्र. १, दि. ७ जून, २००३ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राहील.

५. सदरहू शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. संलेको/संगणक/१७/२५१, दि.२०.१२.२०१७ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०१३०१४५०५२८०२२ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Bhaurao
Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=692454783803b1bf08be0ff2505a01eb578c61edfbb827457be5704f5b440067, serialNumber=950bc6a64b0801087d4b403d7351619557bcd3489ca14b4e0f644bf05a04e89c, cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2018.01.30 14:57:32 +05'30'

( भा. र. गावित )
सह सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत :-**

१) मा.राज्यपालांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्री यांचे अ.मु.स.
३) मा.मंत्री/राज्यमंत्री, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण यांचे खाजगी सचिव
४) संचालक, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण संचालनालय, पुणे
५) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई
६) प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय,मुंबई
७) प्रधान सचिव,गृहनिर्माण विभाग,मंत्रालय,मुंबई
८) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई
९) सर्व जिल्हाधिकारी
१०) सर्व प्रादेशिक उपआयुक्त,समाजकल्याण विभाग
११) सर्व सहायक आयुक्त,समाजकल्याण विभाग
१२) सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी
१३) महालेखापाल महाराष्ट्र १ /२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर
१४) अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई
१५) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१७) लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई
१८) सर्व सहसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९) सहसचिव (अर्थसंकल्प), सामाजिक न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई
२०) सचिव,विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण विभाग यांचे स्वीय सहायक,मंत्रालय,मुंबई
२१) निवड नस्ती, विजाभज-१.

## परिशिष्ट-अ

शासन निर्णय,क्र. तांसुयो २०१७/प्रक्र-८४/विजाभज-१,
विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक- ३० जानेवारी, २०१८

| अक्र | मुद्दा | बदल |
|---|---|---|
| १ | योजनेअंतर्गत घ्यावयाची कामे | ग्रामीण भागात खालील पायाभूत सुविधा पुढे दर्शविलेल्या अग्रक्रमाने देण्यात याव्यात :- १.विद्युतीकरण, २. पिण्याचे पाणी, ३. अंतर्गत रस्ते, ४. गटारे, ५. शौचालये तसेच समाजमंदीर/ वाचनालय व शक्य असेल तेथे मुख्य रस्त्याला जोडणाऱ्या रस्त्यांची कामे. |
| २ | पोहोच रस्ते | या योजनेअंतर्गत घेण्यात येणारे पोहोच रस्ते गावातील मुख्य रस्त्यापासून जिथपर्यंत तांडा/ वस्ती आहे तिथपर्यंत घेण्यात यावेत. |
| ३ | नामफलक | तांडा/वस्ती सुधार योजनेअंतर्गत घेण्यात आलेल्या कामांचा सविस्तर तपशिल व झालेला खर्च याची माहिती देण्यासाठी कोनशिला/नामफलक बसविण्यात यावा. |
| ४ | कामाच्या निवडीचे अधिकार | या योजनेअंतर्गत करावयाच्या कामाचा ग्राम पंचायतीकडून प्राप्त झालेला प्राधान्यक्रम व निकड लक्षात घेऊन कामाची निवड करण्याचे पूर्ण अधिकार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीला राहतील. यासाठी पंचवार्षिक आराखडा तयार करावा आणि जिल्हाधिकारी यांची समितीमार्फत मान्यता घेऊन पुढील कार्यवाही करावी. मात्र २०१७-१८ साठी काम घेताना पंचवार्षिक आराखडा तयार करण्यास वेळ लागणार असल्याने २०१७-१८ साठी कामे समितीने आवश्यकतेनुसार ठरवावीत. २०१८-१९ नंतर मात्र पंचवार्षिक आराखडयाप्रमाणे कार्यवाही करावी. या समितीमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कार्यकारी अभियंता,जिल्हा परिषद, मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जिल्हा परिषद, जिल्हा नियोजन अधिकारी व संबंधित पंचायत समितीचे गट विकास अधिकारी आणि जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद हे सदस्य राहतील. सहायक आयुक्त, समाजकल्याण विभाग/ विमुक्त जाती,भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग हे सदस्य सचिव राहतील. वरील समिती कामाचे गुणवत्ता व इतर संनियंत्रणाबाबत योग्य उपाययोजना करतील/ सुचवतील. समितीने मान्य केलेले सर्व प्रस्ताव संचालक, विमुक्त |

| | | |
|---|---|---|
| | | जाती,भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण संचालनालय, पुणे यांच्यामार्फत शासनाकडे प्रशासकीय मान्यतेसाठी पाठवतील. |
| ५ | प्रशासकीय मंजूरी | कामांना प्रशासकीय मंजूरी देण्याचे अधिकार शासन स्तरावर राहतील. |
| ६ | कामाचे नियंत्रण | कामावर देखरेख व नियंत्रण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी , संबंधित उपअभियंता व जिल्हा परिषदांचे कार्यकारी अभियंता यांच्याकडे राहील. कामाची निवड प्रशासकीय /तांत्रिक मान्यतेची कार्यवाही व निधी वितरण, प्रत्येक आर्थिक वर्षाच्या सप्टेंबर महिन्याअखेर पूर्ण व्हावी व शक्यतो कामे त्याच आर्थिक वर्षात पूर्ण व्हावीत. कोणत्याही परिस्थितीत कामे मंजूर केल्यापासून एक वर्षाच्या आत संबंधित ग्राम सेवकांच्या सहाय्याने ग्राम पंचायतीमार्फत पूर्ण करण्याची जबाबदारी त्या त्या तालूक्याच्या गट विकास अधिकाऱ्याची राहील. गावातील काम अपूर्ण राहिल्यास त्या ग्राम पंचायतीला पुढील दोन वर्षाकरिता निधी देण्यात येऊ नये. तालूका स्तरावर कामाचे निरीक्षण व संनियंत्रणासाठी खालील समिती राहील :-<br>१) तहसिलदार - अध्यक्ष<br>२) गटविकास अधिकारी - सदस्य<br>३) उपअभियंता - सदस्य<br>४) विमुक्त जाती,भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग/ सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे तालूका स्तरावरचे अधिकारी - सदस्य सचिव |
| ७ | तांडा/वस्ती योजनेकरिता निधी वाटप करतानाचा प्राधान्यक्रम | या योजनेअंतर्गत कामे घेताना खालीलप्रमाणे प्राधान्यक्रम द्यावा.<br>१)गावातील ज्या तांडा/वस्त्यांना अद्यापही काहीच लाभ दिला नाही अशा तांडा/वस्त्या.<br>२) जादा अनुदानाचे लाभ देणे बाकी आहे अशा तांडे/वस्त्या.<br>३) काम इतर कोणतीही योजना/ निधी मधून यापूर्वी घेतलेले नसावे.<br>४) एकदा लाभ दिलेल्या तांडा/वस्त्या व दोनदा लाभ दिलेल्या तांडा/वस्त्या बऱ्याचवेळा लोक प्रतिनिधी एकाच तांडा/वस्तीला सलग वर्षभरात लाभ मिळावा यासाठी आग्रही असतात. त्यामुळे प्राधान्यक्रमाने तांडा/वस्तीला लाभ देता येत नाहीत. याकरिता वरीलप्रमाणे प्राधान्यक्रमाने कामे करावीत. |

| | | |
|---|---|---|
| | | ५) जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समितीने कोणते काम घेणे योग्य/आवश्यक आहे त्याप्रमाणे प्राधान्यक्रम ठरवावा. |
| ८ | कार्यपध्दती | १)सहायक आयुक्त, समाज कल्याण विभाग व समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांचे या कामावर योग्य नियंत्रण राहील, त्यासाठी ते आपल्या कामाच्या प्रगतीचा अहवाल संचालक, विमुक्त जाती,भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण संचालनालय, पुणे यांना व शासनास सादर करतील. दर महिन्यात याबाबतचा अहवाल विहित नमुन्यात पाठवतील. विहित नमुना संचालक, विमुक्त जाती,भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण संचालनालय, पुणे/ सचिव, विमुक्त जाती,भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग यांच्या संमतीने ठरवावा.<br>२) पायाभूत सुविधांचा पॅटर्न स्थानिक परिस्थिती व गरज लक्षात घेऊन ग्राम पंचायतीने ठरवावा. बांधकामाचे नमुने व नकाशे/ अंदाजपत्रक पंचायत समितीचे कनिष्ठ अभियंता यांनी तयार करावेत.<br>३) या कामासाठी मंजूर करण्यात आलेली रक्कम कोणत्याही परिस्थितीत इतर प्रयोजनासाठी वळविता येणार नाही. |

-----------